0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून दिनांक २१/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३०/२०१२/जा.२६५, दिनांक २४/०४/२०१२ व १६/०५/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३०/२०१२/जा.२६६, दिनांक २४/०४/२०१२.

४) टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चें मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर यांच्या वतीने ॲड. श्री. सिध्दार्थ घोलप यांनी सादर केलेले दिनांक १५/०५/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

५) मे. मारुती सेंट्रल कन्झुमर को.ऑप. होलसेल ॲण्ड रिटेल स्टोअर्स लि., वाडीलाल स्वरुपचंद गांधी व टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख यांचे दिनांक ०५/०६/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

६) मे. श्री बालाजी प्रोसेसर्स यांचे दिनांक ०५/०६/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३०/२०१२/जा.५७६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :-३० /०७/२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १३/०३/२०१२ रोजी रबाळे पोलिस ठाणे यांना रात्री २०.३० वाजताच्या सुमारास बातमीदाराकडून खात्रीलायक बातमी मिळाली की, ४०७ मोटार टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ यात काही इसम अधिकृत शिधावाटप दुकानात वितरीत होणारा गहू काळ्या बाजारात विक्री करण्याकरिता, मालाड येथून निघून ठाणे बेलापूर रोडने घेऊन जात आहेत. म्हणून लगेचच दोन पंच बोलावून त्यांना बातमीचा आशय समजावून सांगून ते पंच म्हणून समक्ष हजर राहण्यास स्वखुशीने तयार झाल्याने पोलिस निरिक्षक बर्वे यांनी शिधावाटप कार्यालय, फ परिमंडळ, ठाणे येथील अधिकाऱ्यांना मदत मिळण्याकरिता माहिती देऊन पोलिस ठाणे दैनंदिनीत नोंद करुन पोलिस निरिक्षक कोकरे, पोलिस निरिक्षक बर्वे, बिट मार्शल कर्तव्यास असणारे पो.ना./लिंगायत, पोशि/तडवी, श्री. दिनेश अशोक

0002

निकम/पोशि व स्टाफ यांनी ठाणे-बेलापूर रोडवर, साऊथ कोस्ट हॉटेल, रबाळे रेल्वे स्टेशन जवळ, रोडलाईटच्या उजेडात सापळा रचला असता, मिळालेल्या बातमीप्रमाणे नमूद टेम्पो हा २१.३० वाजता बेलापूर बाजूकडे जात असतांना दिसला. त्यावेळी लागलीच नमूद ४०७ मोटार टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ हा हात देऊन रोडच्या बाजूस चालकास थांबविण्याचा इशारा केला असता, चालकाने नमूद टेम्पो हा रोडच्या कडेला थांबविला. नंतर चालक यास खाली उतरवून नमूद टेम्पोमध्ये काय आहे, याची विचारणा केली असता, चालक कोणतेही समाधानकारक उत्तरे देत नव्हता. त्यावेळी पंचांसमक्ष नमूद टेम्पोमध्ये चढून पाहणी करता, त्यात गहू असल्याचे आढळून आले. त्यावेळी चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे टेम्पोमधील गव्हाचे चलनाबाबत व बिलाबाबत विचारपुस केली असता, त्याने दिपक ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ०२, गोकूळ बिल्डिंग, सिम्पोली, बोरीवली वेस्ट, मुंबई बिल नं. २४६९ अशी पावती दाखवली. त्यावरुन सदर पावती ही बनावट असल्याचे दिसून आल्याने मिळालेल्या बातमीची खात्री करण्याकरिता टेम्पोतील गव्हाच्या बारदानाच्या गोण्या, सफेद रंगाच्या प्लॅस्टिक गोण्यामधून गव्हाची पहाणी केली असता, तो गहू लाल रंगाचा दिसून आला. त्यावेळी सदर माल हा रेशनिंग दुकानांत वितरीत होणारा गहू असलेबाबत पंचांची व पोलिस पथकाची खात्री झाल्याने नमूद टेम्पो चालकास सदरचा माल कोठून भरला व कोठे खाली करण्यास जात आहे, याबाबत विचारपूस केली करता, त्याने सदर माल हा साकीनाका व मालाड येथून मारुती सेंट्रल कन्झुमर सोसायटी यांचेकडून भरुन बदलापूर एमआयडीसी येथील बालाजी मिलमध्ये खाली करण्यास घेऊन जात असल्याबाबत सांगितले. सदर माल हा कोणाच्या मालकीचा आहे, याबाबत टेम्पो चालकास विश्वासात घेऊन विचारपूस करता, टेम्पो चालकाने नमूद माल हा त्याचे ओळखीचा वाडीलाल या इसमाचे असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर टेम्पो हा टेम्पो चालकासह ताब्यात घेऊन पोलिस ठाणेत आणून पंचांसमक्ष टेम्पोमधील गव्हाच्या गोण्या हमालांकरवी खाली उतरविले असता, खालील वर्णनाच्या गव्हाच्या गोण्या मिळून आलेल्या आहेत. त्याचे वर्णन खालील प्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | शिधावाटप दुकानांमध्ये वितरीत होणाऱ्या गव्हाचे अंदाजे ५० किलो वजनाच्या सफेद प्लॅस्टिकच्या ३७ भरलेल्या गोण्या व बारदानाच्या गव्हाने भरलेल्या ३३ गोण्या | ३५०० किलो | ३५,०००/- |
| २. | ४०७ मोटार टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ | १ नग | १,५०,०००/- |
| | | एकूण | १,८५,०००/- |

येणेप्रमाणे वरील वर्णनाचा व किंमतीचा शिधावाटप दुकानात वितरीत होणाऱ्या गव्हाच्या गोण्या टेम्पो 003 चालक हा बाजाली मिल बदलापूर येथे काळ्या बाजारात विक्री करुन घेऊन जात असताना मिळून आल्याने त्या सुरक्षिततेसाठी परत नमूद टेम्पोमध्ये भरुन सदर टेम्पोस लोखंडी शटर असल्याने ते बंद करुन कुलूप लावून त्यास पंचाचे व पोलिसांचे सहीचे कागदी लेबल कुलूपास लावून ते सिलबंद करुन टेम्पोसह ताब्यात घेतले आहे. तसा सविस्तर पंचनामा पोलिस निरिक्षक बर्वे यांनी केला आहे.

अशाप्रकारे ४०७ मोटार टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ वरील चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख याने त्याचे ओळखीचा वाडीलाल याचे मदतीने त्याच्या ताब्यात मिळून आलेला वरील वर्णनाचा व किंमतीचा अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये वितरीत होणारा सरकारी कोठ्यातील गहू अनधिकृतपणे बदलापूर एमआयडीसीमधील बालाजी फ्लोअर मिल या कंपनीस काळाबाजाराने विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ चा भंग केल्यावरुन रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II १०/२०१२ दिनांक १४/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती पोलिस निरीक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब अनुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १५/०५/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १५/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर व त्यांच्या वतीने ॲड. श्री. सिध्दार्थ घोलप हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व त्यांनी टेम्पो मालकाच्या वतीने वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख हे उपस्थित राहिले. परंतू त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. सदर सुनावणीस उपस्थित टेम्पो मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर यांनी परिवहन विभागाकडील टेम्पोचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख

मिळण्यास विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ०५/०६/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. मारुती सेंट्रल कन्झुमर को.ऑप. होलसेल ॲण्ड रिटेल स्टोअर्स लि. चे चेअरमन नितीन शाह, वाडीलाल स्वरुपचंद गांधी, टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर व त्यांच्या वतीने ॲड. श्री. सिध्दार्थ घोलप यांचेसह उपस्थित राहून मागील सुनावणीमध्ये सुचित केल्यानुसार त्यांचे वाहनासंबंधीचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून प्राप्त नोंदणी प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रति सादर केल्या. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. तथापी, मे. श्री बालाजी प्रोसेसर्स यांनी वाचावे क्र. ६ अन्वये टपालामार्फत लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक १५/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ॲड. श्री. सिध्दार्थ घोलप यांनी टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर यांच्या वतीने युक्तीवाद केला की, टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ (याचा पुढे उल्लेख सदर टेम्पो असा करण्यात येईल) चे मालक त्याचे अशिल वेदप्रकाश दौलतराव पाटणकर हे आहेत. तसेच सदर टेम्पोचा चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख हा होता हे खरे आहे. तसेच टेम्पो आणि चालकास नमूद केलेल्या प्रस्तूत तथाकथीत गुन्ह्यात रबाळे पोलिसांनी ताब्यात घेतले हे म्हणणेही खरे आहे. याव्यतिरिक्त सदर तथाकथीत गुन्हा घडला याबद्दलची माहिती त्याच्या अशिलाला रबाळे पोलिसांकडून मिळालेली आहे व त्याचे अशिल हे सदर टेम्पोचे मालक असून याव्यतिरिक्त त्यांची कोणतीही भुमिका नाही. सदर टेम्पो ताब्यात घेतल्यावर रबाळे पोलिसांकडून कारणे दाखवा नोटीसीत वर्णीलेली माहिती त्याच्या अशिलास मिळाली. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही माहिती अगर सुचना त्याच्या अशिलास नव्हती. त्यांचे अशिल सदर टेम्पो हा भाड्याने देण्याचे काम करीत होते. त्यासाठी त्यांनी नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख हा चालक ठेवलेला असून त्यांचा अशिलाचा सदर चालकावर पूर्ण भरोसा होता. त्यामुळे सदर टेम्पोमध्ये कोणता माल आहे,

याची पडताळणी प्रत्यक्षपणे त्यांचे अशिल करत नव्हते. केवळ ते दिवसाचे भाडे आकारणे याचीच नोंद ते ठेवीत होते. त्यामुळे परिच्छेदात वर्णिलेल्या गुन्ह्याशी त्यांच्या अशिलाचा कोणताही संबंध नाही. कारणे दाखवा नोटीसीत वर्णिलेला गुन्हा त्यांच्या अशिलाने केलेला नाही. अगर तसा करण्याचा त्यांच्या अशिलाचा कोणताही इरादा नव्हता. सदर गुन्हा घडला असल्यास ते नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख याच्या निष्काळजीपणामुळे झाला असावा अगर त्याने जाणून बुजून केला असावा. सदर टेम्पो व्यतिरिक्त अन्य जप्त मुद्देमालाबाबत त्यांच्या अशिलाची कोणतीही भुमिका नाही. त्याचे अशिल हा कायदा पाळणारा नागरीक असून, सदर टेम्पोचा मालक आहे व सदर टेम्पो हा त्यांच्या अशिलांच्या उदरनिर्वाहाचे साधन असून टेम्पो भाड्याने देणे हे त्याच्या अशिलाचे काम आहे. सदर टेम्पो हा गुन्हा घडणेपूर्वीपासून गुन्हा घडेपर्यंत चालकाच्या ताब्यात होता व त्याचे अशिलास खोटे सांगून भाड्याने दिलेला होता. सदर टेम्पो हा मालवाहतूक करण्यासाठी भाड्याने देण्याचा व्यवसाय होता व त्याचे अशिल हे दैनंदिन व्यवहारात प्रत्येक माल जो सदर टेम्पोमध्ये वाहतूक होत होता, तो प्रत्यक्षपणे तपासत नव्हते. त्यासाठी चालकावर विसंबून असत. सदर गुन्ह्याच्या प्रकरणाशी त्याचे अशिलाचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे सदर टेम्पो व्यतिरिक्त असलेल्या मुद्देमालाबाबत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचा निर्णय त्याचे अशिलास मान्य असेल. त्याचे अशिलाने त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी सदरील टेम्पो जानेवारी, २०१२ मध्ये विकत घेतला होता. सदरचा टेम्पो हा त्याचे अशिलाच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी एकमेव साधन आहे. ह्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही साधन त्याचे अशिलाकडे नाही. त्याचे अशिलाने सदर टेम्पो हा कर्ज काढून विकत घेतलेला असून दोन महिन्यापासून कर्जाचे हफ्ते त्याचे अशिल भरु शकले नाहीत. उदरनिर्वाहासाठी सदर टेम्पो मालवाहतूक करण्यास भाड्याने देतात, याव्यतिरिक्त त्यांचे अशिलाचा कोणताही संबंध नाही. तरी त्यांचे अशिलाचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून प्रस्तूत गुन्ह्यातील मुद्देमाल (सदर टेम्पो) हा परत मिळावा. त्यासाठी त्यांचे अशिलाकडून आवश्यक असल्यास योग्य ते हमीपत्र अगर अन्य दस्तऐवज घेण्यात यावेत. जरुरंतर कैफियत दुरुस्तीस व जादा प्लीडिंग करणेस मुभा मिळावी. इतर योग्य व न्यायाचे हुकूम त्याचे अशिल यांच्या लाभांत करण्यात यावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मारुती सेंट्रल कन्झुमर को.ऑप. होलसेल ॲण्ड रिटेल स्टोअर्स लि. चे चेअरमन नितीन शाह यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याने नमूद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा व टेम्पो याच्या विल्हेवाटीस त्यांची हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित वाडीलाल स्वरुपचंद गांधी यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणामध्ये त्याचा कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप नाही. तसेच कोणत्याही प्रकारे सदरील मालमत्ताबाबत मालकी अधिकार नाही. सदरील प्रकरणामध्ये त्याला खोट्या स्वरुपात फसविण्यात आलेला आहे. तरी मालमत्ता विल्हेवाट व हक्क संबंधी हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख यांनी युक्तीवाद केला की, तो दिनांक १३/०३/२०१२ रोजी साकीनाका येथे न्याक्यावर भाड्यासाठी उभा होता. तो श्री. वीरप्रकाश दौ. पाटणकर यांच्याकडील टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ या गाडीवर चालक म्हणून काम करत होता. दिनांक १३/०३/२०१२ रोजी दुपारच्यावेळेस त्याला भाड्यासाठी एका व्यक्तीकडून विचारणा करण्यात आली. त्यावेळेस गाडी उभी असल्याकारणाने तो भाडे नेण्यास तयार झाला. गाडीमध्ये गव्हाचे पोती साकीनाका व मालाड येथून अंबरनाथ येथील बालाजी नावाच्या मिलमध्ये गाडी खाली करावयाची होती. त्याला माहित नव्हते की त्या पोत्यातील गहू रेशन दुकानातील आहे, की अजून कुठला आहे. भाड्याच्या संदर्भात मालक श्री. पाटणकर यांना त्याने काहीच सांगितले नाही. त्या तारखेस गाडी कामासाठी कुठेच गेली नव्हती. गाडी उभी असल्यामुळे तो भाडे नेण्यासाठी तयार झाला. त्या पोत्यातील गहू रेशनचा होता हे त्याला कसे माहित असणार ? तो अशिक्षित असल्याकारणाने त्याला लिहता वाचता येत नाही. दिनांक १३/०३/२०१२ रोजी संध्याकाळी रबाळे येथे गाडी पोलिसांकडून थांबवण्यात आली आणि चौकशीअंती त्याला असे समजले की, त्या पोत्यातील गहू हा रेशन दुकानातील आहे. त्याबाबत त्याला अगोदर काहीच माहीत नव्हते. नाक्यावर गाडी भाड्यासाठी उभी असताना मालाची वाहतूक करण्यासाठी भाड्याने नेली जात असते. सदरील गुन्ह्यात त्याचा काहीच हात नाही. तरी योग्य तो आदेश पारीत व्हावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. श्री बालाजी प्रोसेसर्स यांनी दिनांक ०५/०६/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, कारणे दाखवा नोटीसीत त्यांच्यावर केलेला आरोप खोटा केलेला आहे व सरकारी रस्त्यावर कोण माणूस कोणती गाडी घेऊन उभा आहे, हा त्यांचा दोष नाही. सदर प्रकरणात त्यांचे नाव दोषमुक्त करावे, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.



OF RATIONING HEAD MUM

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १३/०३/२०१२ रोजी रबाळे पोलिस ठाणे येथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह ठाणे-बेलापूर रोडवर, साऊथ कोस्ट हॉटेल, रबाळे रेल्वे स्टेशन जवळ, रोडलाईटच्या उजेडात सापळा रचला असता, मिळालेल्या बातमीप्रमाणे नमूद टेम्पो हा २१.३० वाजता बेलापूर बाजूकडे जात असतांना दिसला. त्यावेळी लागलीच नमूद ४०७ मोटार टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ हा हात देऊन रोडच्या बाजूस चालकास थांबविण्याचा इशारा केला असता, चालकाने नमूद टेम्पो हा रोडच्या कडेला थांबवून चालकास नमूद टेम्पोमध्ये काय आहे, याची विचारणा केली असता, चालक कोणतेही समाधानकारक उत्तरे देत नव्हता. त्यावेळी पंचांसमक्ष नमूद टेम्पोमध्ये चढून पाहणी करता, त्यात गहू असल्याचे आढळून आले. त्यावेळी चालक नामे नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख याचेकडे टेम्पोमधील गव्हाचे चलनाबाबत व बिलाबाबत विचारपुस केली असता, त्याने दिपक ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ०२, गोकूळ बिल्डिंग, सिम्पोली, बोरीवली वेस्ट, मुंबई बिल नं. २४६९ अशी पावती दाखवली. त्यावरुन सदर पावती ही बनावट असल्याचे दिसून आल्याने मिळालेल्या बातमीची खात्री करण्याकरिता टेम्पोतील गव्हाच्या बारदानाच्या गोण्या, सफेद रंगाच्या प्लॅस्टिक गोण्यामधून गव्हाची पहाणी केली असता, तों गहू लाल रंगाचा दिसून आला. त्यावेळी सदर माल हा रेशनिंग दुकानांत वितरीत होणारा गहू असलेबाबत पंचांची व पोलिस पथकाची खात्री झाल्याने नमूद टेम्पो चालकास सदरचा माल कोठून भरला व कोठे खाली करण्यास जात आहे, याबाबत विचारपूस केली असता त्याने सदर माल हा साकीनाका व मालाड येथून मारुती सेंट्रल कन्झुमर सोसायटी यांचेकडून भरुन बदलापूर एमआयडीसी येथील बालाजी मिलमध्ये खाली करण्यास घेऊन जात असल्याबाबत सांगितले. सदर माल हा कोणाच्या मालकीचा आहे, याबाबत टेम्पो चालकास विश्वासात घेऊन विचारपूस करता, टेम्पो चालकाने नमूद माल हा त्याच्या ओळखीचा वाडीलाल या इसमाचे असल्याचे सांगितले. अशाप्रकारे घटनास्थळी अधिकाऱ्यांनी सदर टेम्पो व ३५०० किलो गव्हाचा साठा जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख याने दिनांक १५/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस त्याला काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर करण्यास नकार दिला व सुनावणीमध्ये सदरचा गव्हाचा साठा हा ज्या दुकानातून भरला आहे. ते रेशन दुकान असल्याची शक्यता असल्याचे सांगून सदरचे दोन्ही दुकाने तो सद्य:स्थितीत आठवत नसल्याने दाखविण्यास असमर्थ असल्याचे मौखिक सांगितले व तद्नंतर दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, दिनांक १३/०३/२०१२ रोजी दुपारच्यावेळेस त्याला भाड्यासाठी एका व्यक्तीकडून विचारणा करण्यात आली. त्यावेळेस गाडी उभी असल्याकारणाने तो भाडे नेण्यास तयार झाला. गाडीमध्ये गव्हाचे पोती साकीनाका व मालाड येथून

अंबरनाथ येथील बालाजी नावाच्या मिलमध्ये गाडी खाली करावयाची होती. सदर पोत्यातील गव्हाचा साठा हा रेशन दुकानातील असल्याबाबत त्याला काहीच कल्पना नव्हती व दिनांक १३/०३/२०१२ रोजी संध्याकाळी रबाळे येथे गाडी पोलिसांकडून थांबवण्यात आली आणि चौकशीअंती त्याला असे समजले की, त्या पोत्यातील गहू हा रेशन दुकानातील आहे. तसेच घटनास्थळी पोलिसांनी गाडीसोबत ताब्यात घेतलेल्या कागदपत्रांमध्ये मे. दिपक ट्रेडिंग कंपनी या आस्थापनाचे बिल आढळून आले. तथापी, सदरचे बिलही बोगस असल्याबाबत पोलिसांना पुढील तपासात निष्पन्न झालेले आहे. तसेच सुनावणीच्यावेळी सदर साठ्याच्या मालकीचा कोणीही दावा केलेला नाही. अथवा सदर साठ्याच्या पुराव्यादाखल खरेदी बिलेही सादर केली गेली नसल्याने टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ मधील जप्त करण्यात आलेला गव्हाचा संपूर्ण साठा हा शासन नियंत्रित दराचा अनुदानित साठा असल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३०/२०१२/जा.२६६, दिनांक २४/०४/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

जप्त करण्यात आलेल्या टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक वेदप्रकाश दौलतराव पाटणकर यांचे वतीने ॲड. श्री. सिध्दार्थ घोलप यांनी केलेल्या खुलाशात, टेम्पोचा चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख यास नमूद गुन्ह्यात रबाळे पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याचे अशिल हे सदर टेम्पोचे मालक असून याव्यतिरिक्त त्यांची कोणतीही भुमिका नाही. त्यांचे अशिल सदर टेम्पो हा भाड्याने देण्याचे काम करीत असल्याने त्यासाठी त्यांनी नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख हा चालक ठेवलेला असून त्यांचा अशिलाचा सदर चालकावर पूर्ण भरोसा होता. सदर गुन्हा घडला असल्यास ते नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख याच्या निष्काळजीपणामुळे झाला असावा अगर त्याने जाणून बुजून केला असावा, असे मोघम स्वरुपाचे बेजबाबदारपणे निवेदन सादर केले आहे. वास्तविक पाहता टेम्पोचे मालक म्हणून टेम्पोच्या भाडेतत्त्वावर देण्याची जबाबदारी त्यांची असल्याने ते स्वतः या घडलेल्या गुन्ह्याबाबत अनभिज्ञ असल्याचे सांगणे ही संशयास्पद बाब आहे. सदर टेम्पो हा त्याच्या अशिलाच्या उदरनिर्वाहाचे साधन असून टेम्पो भाड्याने देणे हे त्याच्या अशिलाचे काम आहे. सदर गुन्ह्याच्या प्रकरणाशी त्याचे अशिलाचा कोणताही संबंध नाही. तरी त्याचे अशिलाचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून प्रस्तूत गुन्ह्यातील मुद्देमाल (सदर टेम्पो) हा परत मिळावा. त्यासाठी त्याचे अशिलाकडून आवश्यक असल्यास योग्य ते हमीपत्र अगर अन्य दस्तऐवज घेण्यात यावेत, असे नमूद केले आहे. तथापी, टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख यास सदरचा जप्त गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी टेम्पो चा वापर अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन टेम्पो

MUMBAI

क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक यांच्या अपरोक्ष जरी चालकानी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II १०/२०१२ दिनांक १४/०३/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक २४/०४/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्यांच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टेम्पोच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

0010 वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे चालक नजीर अहमद मोहम्मद इजहार शेख
२) टेम्पो क्र. एमएच-०४-एफजे-४११५ चे मालक
३) दिपक ट्रेडिंग कंपनीचे मालक
४) मारुती सेंट्रल कन्झुमर सोसायटीचे अध्यक्ष
५) बालाजी फ्लोअर मिल चे मालक
६) वाडीलाल

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, रबाळे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित त्या कारवाईकरीता अग्रेषित.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.